प्रिय भावा–बहिणींनो,

सप्रेम नमस्कार..

कसे आहात?

गावातले सक्रिय कार्यकर्ते. पुढारी, लोकांच्या अडी–अडचणीला धावून जाणारे धडाडीचे कार्यकर्ते. म्हणून तुमच्यासाठी हे खास पत्र...

तर पत्रास कारण की, तुम्ही बऱ्याचदा स्वतःसाठी, कुटुंब, गावकरी, मित्र–परिवारासाठी कधी ना कधी दवाखान्याची पायरी चढता. हे दवाखाना प्रकरण बऱ्याचदा अचानकच येतं. आपण ग्रामीण–दूर डोंगराळ, आदिवासी भागातले. इथे तर अनेक संकटांना पार करत आपल्या व्यक्तीवर उपचार करण्याचा. जीव वाचवण्याचा. सुखरूप डिलीव्हरीचा एक यशस्वी प्रयत्न करत असतो.

गाडी–रस्ता–दवाखाना, तिथे पोचल्यावर डॉक्टर भेटेल की नाही. अशी अडथळ्यांची शर्यत पार करत असताना, पैशाचा प्रश्न आऽऽ वासून उभा असतो. हा पैशाचा प्रश्न कसा सोडवता येईल? यासाठी बरीच माहिती तुम्हाला असेलच. पण जर आतापर्यंत कुणी सांगितले नसेल तर हे आमचं पत्र तुमच्यासाठी एक महत्त्वाचा कागद ठरेल. जो तुम्ही वाचून घ्याल. समजून घ्याल. तुमच्या गावात यानुसार काही गोष्टी नक्की कराल. आणि हां, आम्हाला या पत्राचं उत्तरही लिहालं ही आशा.

तर मंडळी, आपल्या गावात ग्रामपंचायत स्तरावर आरोग्यासाठी काही शासकीय समित्या आणि काही पैशांची/निधींची तरतूद शासनस्तरावर करण्यात आलेली आहे. आपल्या गावातील लोकांचा सहभाग घेऊन त्यांचे आरोग्याचे प्रश्न स्थानिक पातळीवर सोडवणे हा उद्देश आहे. यासाठी गावामध्ये कोणत्या समित्या व त्यासाठी किती निधी उपलब्ध आहे, हे पुढीलप्रमाणे–

## ‘गाव आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती’

- ग्रामपंचायतीचे, अध्यक्ष– सरपंच, सचिव– आशा, सदस्य– अंगणवाडीताई, नर्सबाई (ए.एन.एम.) व बचतगट प्रमुख आहेत.
- याबरोबरच पालक–शिक्षक संघटनेचे सचिव, तरुण मंडळांचे प्रतिनिधी, गावात हक्कासाठी काम करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी, वंचित समूहातील नागरिकांपैकी काही लोकं हे पण समितीचे मेंबर असतील. ५० टक्के महिलांच्या सहभागास इथे खूप महत्त्व आहे.
- सरपंच व आशा कार्यकर्ती यांचे संयुक्त (Joint) खाते काढावे लागते. त्या खात्यावर गावाच्या लोकसंख्येनुसार पैसे/निधी जमा होतो.

| गावाची लोकसंख्या | गावाला मिळणारा निधी (रु.) |
|---|---|
| ०-५०० | ५,०००/ |
| ५०१-१५०० | ८,०००/ |
| १५०१-५००० | १५,०००/ |
| ५००१-१०००० | २४,०००/ |
| १०००१ च्या पुढे | ३०,०००/ |

## पैशाचा/निधीचा उपयोग-

गावातील गरजू व्यक्तीच्या आजारपणात तात्पुरती आर्थिक मदत, कुपोषण, गावातला परिसर स्वच्छ ठेवणे, खड्डे बुजवणे, सांडपाण्याची योग्य व्यवस्था करणे, लोकांमध्ये सरकारी दवाखान्याची जनजागृती, आरोग्य हक्काचे कार्यक्रम. अपघातानंतर, बाळंतपणाच्या वेळी, गंभीर आजारी व्यक्तीला ॲम्बुलन्ससाठीचा खर्च या निधीतून करता येईल.

शासन निर्णयानुसार सर्वच गावांना निधीची तरतूद लोकसंख्येनुसार आहे. मात्र, बहुतांश गावांमध्ये निधी वितरणाचे आकडे वेगवेगळे आहेत. कारण या आधीच्या वर्षांमध्ये खर्चाचे तपशील वरच्या पातळीवर वेळेत दिले नाही. त्यामुळे गावांना चालू वर्षी निधी कमी/अधिक प्रमाणात मिळत आहे, याची दखल घ्यावी.

## याशिवाय गावात आरोग्यासाठी विविध मार्गाने पैसा उपलब्ध करता येतो.

- ग्राम निधी (कलम ५७)
- राज्यातून मिळणारे योगदान
- गावाला मिळालेली बक्षिसे
- गावांमध्ये कंपनीमार्फत काम सुरू असल्यास
- नागरिकांचा ग्रामपंचायतीतील कर
- १५ वा वित्त आयोग
- स्वच्छ भारत अभियान
- पेसा
- आदिवासी भागासाठी अंगणवाडीमधील अमृत आहार योजना
- आरोग्यवर्धिनी केंद्र (उपकेंद्र) अंतर्गत 'जन आरोग्य समिती' (ज्या गावात आरोग्यवर्धिनी केंद्र असेल त्याकरिता लागू)
- आमचा गाव-आमचा विकास आराखडा इत्यादी.

## आमचा गाव आमचा विकास आराखड्यामधून खर्च करण्याचे नियम :

ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत निधीच्या ६०% अबंधित निधी

१. गावातील स्वच्छता व हगणदारी मुक्त गाव

२. जलपुनर्भरण

३. पाण्याच्या व पावसाच्या साठवणुकीसाठी खर्च करायचा आहे.

उर्वरित ४०% निधीमध्ये पुढील बाबींवर शेजारी दिलेल्या कोष्टकातील आकडेवारीच्या प्रमाणात खर्च करायचा आहे :

| क्र. | विषय | ग्रामपंचायतीच्या उपलब्ध निधीपैकी खर्च करायची रक्कम % मध्ये |
|---|---|---|
| ०१ | महिला बाल विकास | १० % |
| ०२ | अनुसूचित जाती व जनजातीचे कल्याण | लोकसंख्येच्या प्रमाणात / ग्रा.पं.च्या उत्पन्नातील १५% |
| ०३ | आरोग्य, शिक्षण व उपजीविका | २५% |
| ०४ | ग्रामपंचायतीच्या प्राथमिकतेनुसार | अन्य |

आदिवासी गावांना पेसा अंतर्गत लोकसंख्येच्या प्रमाणात मिळणारा ५% निधी खर्च करण्याचे नियम :

| क्र. | पायाभूत सुविधा | लोकसंख्येच्या प्रमाणानुसार निधी उपलब्ध होतो. |
|---|---|---|
| ०१ | वन अधिकार कायदा आणि पेसा करिता | |
| ०२ | शिक्षण, आरोग्य आणि उपजीविका | |
| ०३ | वनसंरक्षण, वनसंवर्धन, जनावरांचे जतन, वन जीवनसत्त्वे | |

## वरील ५% अबंधित निधी आरोग्यावर कसा खर्च करता येऊ शकतो ते खालीलप्रमाणे...

अ) पायाभूत सुविधा –

१. संबंधित पेसा गावातील ग्रामपंचायत कार्यालये, आरोग्य केंद्रे, अंगणवाड्या, शाळा, दफनभूमी, गोडाऊन, गावांचे अंतर्गत रस्ते व तत्सम पायाभूत सुविधा इ.साठी खर्च करणे.

ब) वन हक्क अधिनियम (FRA- फॉरेस्ट राईट्स ॲक्ट) व पेसा (PESA-पंचायत एक्सटेंशन शेड्यूल एरिया ॲक्ट १९९६) कायद्याची अंमलबजावणी –

१. आदिवासींना त्यांच्या उदरनिर्वाहाच्या व्यवसायाच्या संदर्भात प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रशिक्षण/मार्गदर्शन करणे.

२. गावतळी विकास किंवा मत्स्यपालन व्यवसाय / मत्स्यबीज खरेदी.

३. सामाईक जमिनी विकसित करून देणे.

४. गौण पाणी साठ्याचे व्यवस्थापन.

५. सामाईक नैसर्गिक साधनसंपदा व सामाईक मालमत्ता विकसित करणे.

क) आरोग्य, स्वच्छता, शिक्षण –

१. सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणे.
२. गावामध्ये स्वच्छता राखणे.
३. सांडपाणी व्यवस्थेकरिता गटारे बांधणे व त्याची देखभाल करणे.
४. शुद्ध पिण्याचे पाणी पुरविणे.
५. मुलांच्या शिक्षणाचा स्तर वाढावा म्हणून प्रयत्न करणे.
६. गावातील महिला व मुले यांचे आरोग्य विषयक प्रश्न समजून घेऊन ते सोडवण्याचा प्रयत्न करणे.

बंधु–भगिनींनो, या सर्व आरोग्यविषयक पैशांच्या तरतुदींची माहिती कदाचित तुम्हाला असेल तरीही आणखी काही लोकांपर्यंत पोचण्यासाठी तुम्ही हे पत्र त्यांना पाठवू शकता. या शिवाय आणखी काही माहिती तुमच्याकडे नक्की असेल अशी आम्हाला खात्री आहे. कृपया ती माहिती आम्हाला जरूर कळवा.

ह, आणखी एक महत्त्वाचा विषय राहिलाच की. ग्रामसभा. वर्षातून ज्या ग्रामसभा होतात त्यामध्ये आपण आरोग्य प्रश्न सोडवण्यासाठी पैशांची मागणी करू शकतो. आणि 'आरोग्य ग्रामसभा' घेण्यासाठी देखील शासनाचे पत्र आहेच की. ती स्पेशल आरोग्य या विषयावर घ्यायची असते. त्याचा कालावधी म्हणजे दरवर्षी २४ एप्रिल ते १ मे या दरम्यान कधीही 'आरोग्य ग्रामसभा' घेता येते.

तर मंडळी, आता वाटतं या पत्रात एवढं पुरं झालं. तुम्हाला काही सांगायचं असेल. आमच्याकडून काही राहिलं असेल तर नक्की या पत्राला उत्तर द्या. हा, फक्त आरोग्याविषयी बरं का. तुमच्या पत्राची आम्ही आतुरतेने वाट बघू.

सप्रेम.

तुमचे,

जिल्हा व राज्य समन्वय संस्था, साथी संस्था, पुणे.
'राष्ट्रीय आरोग्य अभियान' अंतर्गत, 'कम्युनिटी ॲक्शन फॉर हेल्थ' (CAH) प्रक्रिया, महाराष्ट्र

प्रकाशक

साथी (Support for Advocacy and Training to Health Initiatives (SATHI))
फ्लॅट नं. ३ व ४, अमन ई टेरेस,
डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे–३८

फोन : २०–२५४७२३२५, २०–२५४७३५६५
ई–मेल : sathicehat@gmail.com
वेबसाईट : www.sathicehat.org
मुद्रण : संस्कृती डिझायनर्स अँड प्रिंटर्स
फेब्रुवारी, २०२४